● मंगळवार, दि. २८ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १८० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# वारकरी संप्रदायामुळे भारतीय संस्कृती टिकून!

माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन; दैठणा खुर्द येथे गुरु गंगाभारती बाबा यांच्या ३२ व्या पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह किर्तन सोहळा

**परतूर । प्रतिनिधी -** महाराष्ट्र ही साधुसंतांची भूमी असून या पवित्र भूमीमध्ये साधुसंतांनी विचारांचा जागर केल्यामुळे विविध संप्रदायांच्या माध्यमातून भारतीय संस्कृती टिकवण्याचं काम केलं आहे वारकरी संप्रदाय देखील अहोरात्र देव देश आणि धर्मासाठी काम करत आहे वारकरी संप्रदायामुळेच आज समाजातील नैतिक मूल्य टिकून आहेत त्यामुळेच आज भारतीय संस्कृती महाराष्ट्राची संस्कृती टिकून आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले

परतुर तालुक्यातील दैठणा येथे गुरु गंगाभारती बाबा यांच्या ३२ व पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहतील काल्याच्या कीर्तन सोहळ्याप्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, र्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांमधून नवी ऊर्जा मिळते आणि जनसेवेसाठी हीच ऊर्जा कारणीभूत ठरते त्यामुळे साधुसंतांच्या आशीर्वादाशिवाय काहीही होऊ शकत नाही अशी माझी धारणा आहे आमदार म्हणून आणि मागील काळात राज्याचा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री म्हणून मी जे काही करू शकलो ते केवळ साधू संतांच्या आशीर्वादामुळे करू शकलो असे माझे स्पष्ट मत आहे भारतीय संस्कृती जतन करण्यासाठी आयोजित या सर्व धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजाला नवी ऊर्जा मिळते आणि त्या ऊर्जेच्या बळावरच प्रत्येक व्यक्ती आपली उन्नती साधू शकतो असे देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.

मंत्री असो किंवा नसो जनसामान्यांसाठी काम करणे हा माझा पिंड असून मंत्री नसलो तरी निधीची कुठलीही कमतरता विधानसभा मतदारसंघाला भासू देणार नाही मंत्रिपदाच्या ताकती एवढाच निधी मंत्री नसलो तरी खेचून आणण्याची क्षमता तुम्ही दिलेल्या आमदारांमध्ये आहे आणि ती क्षमता केवळ साधुसंत भगवंत निष्ठावंत आणि लाडक्या बहिणींच्या आशीर्वादामुळे आहे या सर्वांच्या आशीर्वादामुळेच मला पाचव्यांदा विधानसभा निवडणुकीत यश मिळाले असून पुन्हा एकदा जनसामान्यांची सेवा करण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहील असे देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले

पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की परतुर विधानसभा मतदारसंघात मागील दहा वर्षांच्या कालावधीमध्ये तीनशे गावांना डांबरीकरणाचे रस्ते निर्माण केले आहेत प्रत्येक गावामध्ये सभामंडप सिमेंट रस्ता देण्याचं काम देखील केला आहे साधुसंत आणि भगवंताच्या आशीर्वादामुळे पाचव्यांदा आमदारकी मिळाले या गोष्टीची जाण मला आहे त्यामुळेच परतून विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक देवस्थानाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील असून कोट्यावधी रुपयांचे सामाजिक सभागृह सांस्कृतिक सभागृह उभारणीचे काम देखील करण्यात आले आहे यापुढे देखील ज्या ठिकाणी मंदिर बांधकाम होईल त्या ठिकाणी सभामंडप बांधण्याची जबाबदारी माझी असेल असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले

पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की एक लाखापेक्षा अधिक माता-भगिनींना लाडकी बहीण योजनेचा लाभ आपण मिळवून दिला असून वारकऱ्यांच्या सेवेसाठी शेगाव ते पंढरपूर हा सिमेंट काँक्रीट चा दर्जेदार रस्ता राष्ट्रीय महामार्गाच्या रूपाने आपल्या मतदारसंघातून निर्माण केला आहे माता भगिनींना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागू नये यासाठी देखील मी मागील अनेक वर्षांपासून प्रयत्नशील असून परतुर व मंठा वॉटर गिरणीच्या माध्यमातून माता भगिनींच्या डोक्यावरचा हंडा खाली घेण्याचं काम करण्यामध्ये निश्चितपणे आपल्याला यश आले असून मतदारसंघातील सर्व गावांमध्ये पिण्याचे फिल्टर पाणी शुद्ध पाणी मिळणार आहे मतदारसंघांमध्ये विजेचा



प्रश्न मोठ्या प्रमाणात होता तो प्रश्न देखील १३२ केवी ३३ केवी २२० केवी निर्माण करून मार्गी लावला असून यापुढे देखील सर्वसामान्यांना विजेचा प्रश्न निर्माण होणार नाही याच्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. ज्या साधुसंत भगवंत निष्ठावंत आणि लाडक्या बहिणींमुळे मी निवडून आलो त्या सर्वांची सेवा करण्याचं मी सातत्याने प्रयत्न करणार आहे आपण कधीही मताचे राजकारण केले नसून ज्या गावांमध्ये कमी मते मिळाली आहेत त्या गावांना सुद्धा तितकाच न्याय देण्याचा माझा सातत्याने प्रयत्न असतो होतो यापुढे देखील राहील परंतु जनसामान्यांनी आपलं अमूल्य मत देताना मात्र आपल्या कामाचा माणूस कोण याचा विचार निश्चितपणे केला पाहिजे असेही यावेळी आमदार बबनराव लोणीकर म्हणाले

यावेळी जगद्गुरु तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज हभप पुंडलिक महाराज देहूकर यांनी कीर्तन सेवा दिली प्रसंगी शत्रुघ्न कणसे संपत टकले शिवाजी सवणे गणेशराव सवणे अरविंद सवणे कैलास सवणे वसंत काटकर यांच्यासह माता-भगिनी युवा बांधव ज्येष्ठ नागरिक व वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

युवा आदर्श

## मंदिर ...

उभे राहता मंदिर
लगेचं गर्दी पडते
फलश्रुती जरा येते
लगेचं श्रध्दा जडते
असेलं जुने प्राक्तन
शुभ गोष्ट ती घडते
महोत्सव सुरु होतो
भावना सुरेख मढते
भाविक रांग लागते
ज्यांचे काही अडते
नवसा पावला देव
अफवा भरार उडते
सजू लागती दुकाने
तयार व्यापारी अडते
दुकानदारांच्या रांगा
सारे पथ्यावर पडते
कमावून घ्यावे मस्त
कुणा काय बिघडते
हारफुले मेवा मिठाई
भाग्याचे दार उघडते
कुठूनआले भिकारी
दारिद्र्य सदैव रडते
दानधर्म नावाखाली
समस्या कशी लढते
कुणी कधी अनिच्छे
भयग्रस्त हात जोडते
भक्त अन् पुजा-यांचे
भावनिक नातेजुडते
धार्मिक पर्यटन चाले
चलनवलन ते वाढते
धार्मिक स्थळे नवीन
आलेख दिसेलं चढते

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

पालकमंत्री ना.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांची आमदार बबनराव लोणीकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

# कर्तबगार पालकमंत्री मिळाल्याने जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मदत होईल - आमदार लोणीकर

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल तथा पशुसंवर्धन मंत्री नामदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचे जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून निवड झाल्या पासून प्रथमच आगमन झाले यावेळी पंकजा मुंडे यांनी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली यावेळी फटाक्यांच्या आदेशबाजीसह कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड मोठा उत्साह यावेळी दिसून आला. स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांचा वसा आणि वारसा चालवणाऱ्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना जालना जिल्ह्याचे पालकमंत्री पद मिळाल्यामुळे या पंचवार्षिक मध्ये निश्चितपणे जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न होतील पंकजाताईंच्या रुपाने कर्तबगार पालकमंत्री मिळाल्या त्यामुळे जालना जिल्ह्याचा विकासाचा संपूर्ण अनुशेष भरून काढण्याचं काम त्यांच्या माध्यमातून निश्चितपणे होईल सर्वांना योग्य तो न्याय मिळेल असे मत माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केले.

आमदार बबनराव लोणीकर यांच्या जालना येथील निवासस्थानी पंकजाताई मुंडे यांनी सदिच्छा भेट दिली यावेळी भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी पंकजाताई मुंडे यांचे स्वागत केले. यावेळी लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते माता-भगिनी तथा युवकांमध्ये प्रचंड उत्साह व जल्लोषाचे वातावरण दिसून आले. यावेळी फटाक्यांच्या आतिषबाजी सह अत्यंत जल्लोषाच्या वातावरणात पंकजा मुंडे यांचे स्वागत करण्यात आले. प्रसंगी भाजपाचे पदाधिकारी-कार्यकर्ते उपस्थित होते.

# शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ची अंमलबजावणी करण्यासह वृत्तपत्रांची रखडलेलेली पडताळणी तात्काळ करा

पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांना पीसीएमच्यावतीने वृत्तपत्र व पत्रकारांच्या विविध मागण्यांचे निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** गेली पाच-सहा वर्षांपासून पत्रकार व वृत्तपत्रांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. यात प्रामुख्याने दर दोन वर्षांनी वृत्तपत्रांना महागाई निर्देशांकाची सांगड घालून दरवाढ करणे अपेक्षित असतांना गेल्या सहा वर्षांमध्ये एकदाही दरवाढ करण्यात आली नाही, मागील अडीच वर्षांपासून राज्यभरातील वृत्तपत्रांची पडताळणी रखडलेली असून ही पडताळणी तात्काळ करण्यात यावी. सहाय्यक संचालक आणि उपसंचालक पदांसाठीची एमपीएससीमार्फत भरती प्रक्रिया राबविण्यात यावी. यासह विविध मागण्यांचे निवेदन पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांना रविवार (दि २६) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात आले. यावेळी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याच्यावतीने स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा पालकमंत्रीपदी वर्णी लागल्याबद्दल स्वागत करण्यात आले.

दरम्यान पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी लागलीच स्वीय सहाय्यकांना निवेदन देऊन पाठपुरावा करण्याच्या सुचना दिल्याने वृत्तपत्र व पत्रकारांचे प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यावेळी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, सुहास वैद्य, नरेंद्र जोगड यांची उपस्थिती होती. मागण्यांचा सकारात्मक विचार करून येत्या २० फेब्रुवारी २०२५ पर्यंत मागण्या मान्य करण्यात याव्यात व न्याय द्यावा. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येणार असल्याचा ईशाराही निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे.

मागण्या पुढील प्रमाणे-

शासनमान्य यादीत सामाविष्ट असलेल्या लघु संवर्गातील साप्ताहिकांवर शासनाकडून प्रसिद्धीस देण्यात येणाऱ्या दर्शनी व वर्गिकृत जाहिरात वितरण प्रणालीत प्रत्येकवेळी भेदभाव केल्या जात आहे. प्रसिद्धीस देण्यात येणाऱ्या जाहिराती ह्या मोठे, मध्यम संवर्गासह लघु संवर्गातील दैनिकांना दिल्या जातात. मात्र, लघु संवर्गातील साप्ताहिकांना टाळल्या जात आहे., शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.६ या मुद्द्यात बदल करून सर्व संवर्गातील दैनिक-साप्ताहिक वृत्तपत्रांना समान न्यायाने सरसकट जाहिराती देण्यात याव्यात. तसेच मागील वर्षभरात शासनमान्य यादीवरील लघु संवर्गातील साप्ताहिकांचा अनुषेश भरुन द्यावा.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.५.९ या मुद्यानुसार शासनमान्य यादीत सामाविष्ट असलेल्या लघु संवर्गातील साप्ताहिकांना रंगीत जाहिराती, पहिले पान, विशेष पान, नाविन्यपूर्ण जाहिराती देण्यात याव्यात.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.५.१० यानुसार दर दोन वर्षांनी दरवाढ करण्याचे आदेश आहेत. ४.५.२ मध्ये नमुद कोष्टकातील दराची महागाई निर्देशांकाशी सांगड घालून नवे वाढीव दर देण्यात यावे. ( कारण- गेल्या सहा वर्षांपासून एकदाही दरवाढ करण्यात आली नाही.)

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.१ नुसार शासनाच्या अधिनस्त मंडळ-महामंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वायत्य संस्था आदींना लघु संवर्गातील साप्ताहिकांना जाहिरात देण्याचे बंधनकारक करावे.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.२ मध्ये बदल करण्यात यावा. यात वृत्तपत्रात निविदेसंदर्भात संक्षिप्त स्वरूपात जाहिरात प्रसिद्धीस देण्याची नोंद आहे. ती हटविण्यात येऊन संकेतस्थळावरील विस्तृत स्वरुपात प्रसिद्ध होणारी निविदा ही संपूर्णपणे वृत्तपत्रांना प्रसिद्धीस देण्यात यावी. आणि यातही लघु संवर्गातील साप्ताहिकांनाही अशी संपूर्ण निविदा प्रसिद्धीची जाहिरात देण्यात यावी.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.५ मध्ये बदल करून भुसंपादनाच्या जाहिराती ह्या लघु संवर्गातील साप्ताहिकांना प्रसिद्धीस देण्यात याव्यात. तसेच विभागीय माहिती उपसंचालकांकडून देण्यात येणाऱ्या जाहिरातीत लघु संवर्गातील साप्ताहिकास किमान एक जाहिरात देण्यात यावी



शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.७ मध्ये मान्यताप्राप्त यादीतील सर्व वृत्तपत्रांना एका आर्थिक वर्षात ९ व एक ऐच्छिक जाहिरात देण्यात येत आहे. यात सुधारणा करण्यात यावी. व एका आर्थिक वर्षात किमान २० जाहिराती देण्यात याव्यात.

यात प्रामुख्याने महात्मा गांधी जयंती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती, भगवान महावीर जयंती, नाताळ (२५ डिसेंबर) रमजान ईद, रामनवमी, विजयादशमी, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती, स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर जयंती, पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंती, महिलांच्या सन्मानार्थ महिला दिन अथवा मकर संक्रांत, महाराणा प्रताप जयंती, पंढरपूर यात्रानिमित्त व वृत्तपत्रांच्या वर्धापन दिन यातील जाहिरातीचा समावेश त्यात करण्यात यावा.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.८ नियमाची अंमलबजावणी करण्यात यावी व शासनमान्य यादीत सामाविष्ट नसलेल्या वृत्तपत्रांना या नियमानुसार जाहिरात देण्यात यावी.

शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.१२ नुसार वेब आणि समाजमाध्यमांना जाहिराती देण्यासंबंधी नियमावली निश्चित करण्यात यावी. यात प्रामुख्याने शासनमान्य जाहिरात यादीत सामाविष्ट असलेल्या सर्वच संवर्गातील वृत्तपत्रांच्या वेब (ब्लॉगर/ वर्डप्रेस), युट्युब, फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम आदी सर्व प्रकारच्या समाज माध्यमांना विनाअट जाहिराती देण्यात याव्यात.

एका आर्थिक वर्षात देण्यात येणाऱ्या जाहिराती ह्या ४०० चौसेमी आकाराच्या देण्यात येतात. या आकारात सरसकट वाढ करण्यात येऊन किमान १००० चौसेमी आकाराच्या जाहिराती देण्यात याव्यात.

साप्ताहिकांना देण्यात येणाऱ्या अधिस्विकृती पत्रिकेत वाढ करण्यात येऊन एका साप्ताहिकांच्या किमान ५ व्यक्तींना अधिस्विकृती पत्रिका देण्यात यावी

ज्येष्ठ पत्रकारांना देण्यात येणाऱ्या अधिस्विकृती पत्रिका व पेन्शन संदर्भातील जाचक अटी रद्द करण्यात याव्यात.

शासनमान्य जाहिरात यादीत सामाविष्ट वृत्तपत्रांना देण्यात येणाऱ्या जाहिरातीचे बील हे जाहिरात प्रसिद्धी नंतर किमान ३० दिवसांमध्ये अदा करण्यासंबंधी संबंधीत विभागांना आदेशित करावे. तसेच वृत्तपत्रांची मागील थकीत बीले ही तात्काळ अदा करण्यात यावी.

# बांधकाम व्यवसायिकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्याचे ना. शिंदे यांना साकडे

## जालना क्रेडाईच्या शिष्टमंडळाने दिले विविध मागण्यांचे निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** जालना क्रेडाईचे अध्यक्ष अभय कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन त्यांना दिलेल्या निवेदनात प्रस्ताव मंजुरी प्रक्रिया सुलभ करणे, शहर विकास आराखडा सुधारणा, रेडी रेकनर दर कमी करणे, महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी वेगवान मंजुरी प्रक्रिया राबविणे, संपत्तीकर व विकास शुल्काचा फेरविचार, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प मंजुरी, बीपीएस प्रणालीत भूमी अभिन्यास मंजुरीचे अधिकार नगररचना विभागाला देण्यात यावेत आदी मागण्यांकडे लक्ष वेधले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जालना दौऱ्यावर आले असता, जालना क्रेडाईचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, उपाध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार, सचिव अविनाश भोसले, रवींद्र हुसे, वामनराव राऊत, शरद जैस्वाल, दीपक अंभोरे यांनी त्यांची भेट घेऊन बांधकाम व्यवसायिकांच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले. त्यात म्हटले आहे की,



जालना शहर महानगरपालिका हद्द वाढ प्रस्तावित करण्यात यावी, जालना शहर महापालिकेच्या कामात गती येण्यासाठी वर्षानुवर्ष एकाच विभागात असलेल्या कर्मचारी, अधिकाऱ्यांची बदली करून त्यांचे योग्यतेनुसार समायोजन करण्यात येऊन सर्व प्रमाणपत्रे ऑनलाइन मिळावीत, जालना शहर महापालिकेच्या विकास कामासाठी आयएएस अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली शहर विकास सल्लागार समिती स्थापन करून त्यामध्ये बांधकाम औद्योगिक व सामाजिक क्षेत्रातील अशासकीय प्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा, जालना शहरातून जात असलेल्या पुंडलिका सिना या नद्यांच्या काठावरील अतिक्रमणे काढण्यात यावीत व नद्यांचे संवर्धनदृष्टीने काम करण्यात यावे, नद्यांची ब्लू ताईन मार्किंग करण्यात यावी, बांधकामाच्या विविध प्रमाणपत्रासाठी असणाऱ्या बीपीएमएस प्रणालित वेळोवेळी बिघाड होत असल्याने ही प्रणाली अद्ययावत करून त्यातला होणारी कामे ऑफलाइन पद्धतीने पूर्ण करण्याची करण्याच्या शिफारशीबाबत आदेश द्यावेत, बीपीएस प्रणालीत भूमीअभिन्यास मंजुरीसाठी प्रकरणे मंजुरीसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे जातात. त्यांच्याकडे कामाचा फ्लो अधिक असल्याने मंजुरीला वेळ लागतो. ही बाब विचारात घेता मंजुरीचे अधिकार नगररचना विभागाच्या सहसंचालकाना देण्यात यावेत.

जालना महापालिका हद्दीतील डीपी रोडवरील अतिक्रमणे काढून रहदारीसाठी मोकळे करावे तसेच खेळाची मैदाने, गार्डन इत्यादी विकसित करण्यात यावे; जेणेकरून शहराच्या विकासाला गती मिळेल. बांधकाम परवानगीमध्ये लागणारा लेबर सेस कमी करण्यात यावा; जेणेकरून सामान्य नागरिकांना स्वस्तात घरे मिळण्यास मदत होईल, जालना महानगरपालिके कडून आकारण्यात येणारा इमारत कर तसेच भाडे अवाजावी असल्याने त्याचे मूल्यमापन करण्यात यावे, विकासकाच्या करारनाम्यामध्ये एका सदनिकेसाठी दोनवेळा मुद्रांक शुल्क आकारण्यात येत असल्यामुळे घराच्या किमतीत वाढ होत आहे. त्यासाठी एकदा मुद्रांक शुल्क भरणा केल्यानंतर पुन्हा भरण्याची सक्ती नसावी. रेरामध्ये विकासकासाठी कागदपत्रे कमी करण्यात यावीत; जेणेकरून रेरा नोंदणी लवकरात लवकर मिळण्यास मदत होईल, निवासी / भूमी अभिन्यासाचे विकास करारनामे करताना आकारण्यात येणारे मुद्रांक शुल्क अवास्तव असून त्याची समीक्षा करून ते कमी करण्यात यावे. गरिबांना हक्काची घरे मिळण्यासाठी जालना महापालिका हद्दीतील झोपडपट्ट्या एसआरए प्रकल्पानुसार विकसित करण्यात याव्यात, आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

# वृत्तपत्रांची पडताळणीसह दरवाढ करण्याची मागणी

## उपमुख्यमंत्री शिंदे व आ. लोणीकर यांना निवेदन



**जालना । प्रतिनिधी -** गेली पाच-सहा वर्षांपासून पत्रकार व वृत्तपत्रांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. हे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात यावे या आशयाचे निवेदन प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र (पीसीएम) जालना जिल्ह्याच्यावतीने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच आमदार बबनराव लोणीकर यांना शनिवार (दि २५) रोजी आ. लोणीकर यांच्या निवासस्थानी देण्यात आले आहे. प्रसंगी माजी मंत्री आ. अर्जुनराव खोतकर यांची उपस्थिती होती. यावेळी आ. लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करुन प्रश्न मार्गी लावणार असल्याचे आश्वासन दिले आहे. माजी मंत्री आ. अर्जुनराव खोतकर यांनीही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना याबाबत सविस्तर माहिती देऊन पत्रकार आणि वृत्तपत्रांच्या हितासाठी योग्य ते निर्णय घेण्यासाठी आपण स्वतः पुढाकार घेऊ असे आश्वस्त केले. यावेळी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, सरचिटणीस दर्पण सकलेचा, सुहास वैद्य, नरेंद्र जोगड यांची उपस्थिती होती.

यात प्रामुख्याने गेल्या अडीच वर्षांपासून शासकीय संदेश प्रसार नियमावली-२०१८ नुसार शासनमान्य यादीत समावेश करण्यासाठी राज्यभरातील वृत्तपत्रांची पडताळणी झालेली नाही. त्या अनुषंगाने बैठक झालेली नाही. राज्यभरातील अनेक वृत्तपत्रांचे अहवाल शासन दरबारी प्रलंबित आहेत. ग्रामीण भागातील पत्रकारांना मुख्यालयी त्यांच्या तालुका-जिल्ह्याच्या ठिकाणच्या वृत्तपत्र कार्यालयात येण्या-जाण्यासाठी बस पासची सुविधा उपलब्ध करून द्यावी अथवा या पत्रकारांना अधिस्विकृती पत्रिका मिळावी यासाठी पूर्णवेळ पत्रकारितेची असलेली अट शिथील करण्यात यावी. तसेच गेल्या सहा वर्षांमध्ये एकदाही दरवाढ झालेली नाही, शासकीय संदेश प्रसार नियमावली २०१८ नुसार दर दोन वर्षांनी महागाई निर्देशांकाशी सांगड घालून दरवाढ करणे अपेक्षित होते मात्र, दरवाढ झालेली नाही. नियमानुसार दरवाढ करण्यात यावी, अधिस्विकृती धारक पत्रकारांना काही बसेसमध्ये सवलत मिळत नाही. यासाठी महामंडळाच्या सर्व प्रकाराच्या प्रत्येक बसमध्ये (एसी, नॉन एसी, साधी, निमआराम, रातराणी, इलेक्ट्रीक, एशियाड अशा सर्वच प्रकारच्या ) अधिस्विकृती पत्रिकाधारकांना सवलत मिळावी. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय अंतर्गत सहाय्यक संचालक आणि उपसंचालक पदांसाठी (जाहीरात क्रं. १२९/२०२२, १३०/२०२२ व १३१/२०२२) एमपीएससी मार्फत भरती प्रक्रिया राबविण्यात येत होती. ही प्रक्रिया मागील दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. यात काही पत्रकारांनीही अर्ज केलेले आहेत. ही भरती प्रक्रिय राबविण्यात यावी, शासकीय संदेश प्रसार नियमावली -२०१८ मधील ४.६.२ मध्ये बदल करण्यात यावा. यात वृत्तपत्रात निविदेसंदर्भात संक्षिप्त स्वरूपात जाहिरात प्रसिद्धीस देण्याची नोंद आहे. ती हटविण्यात येऊन संकेतस्थळावरील विस्तृत स्वरुपात प्रसिद्ध होणारी निविदा ही संपूर्णपणे वृत्तपत्रांना प्रसिद्धीस देण्यात यावी. आणि यातही लघु संवर्गातील साप्ताहिकांनाही अशी संपूर्ण निविदा प्रसिद्धीची जाहिरात देण्यात यावी. एका आर्थिक वर्षात किमान २० जाहिराती देण्यात याव्यात. वेब आणि समाजमाध्यमांना जाहिराती देण्यासंबंधी नियमावली निश्चित करण्यात यावी. शासनमान्य यादीत सामाविष्ट नसलेल्या वृत्तपत्रांना या नियमानुसार जाहिरात देण्यात यावी. ४०० चौसेमी ऐवजी १००० चौसेमी आकाराच्या जाहिराती देण्यात याव्यात, ज्येष्ठ पत्रकारांच्या पेन्शन संदर्भातील जाचक अटी रद्द करण्यात याव्यात, ग्रामीण भागातील पत्रकारांना अधिस्विकृती पत्रिका मिळावी यासाठी साप्ताहिक व दैनिकांना देण्यात येणाऱ्या अधिस्विकृती पत्रिकेत वाढ करण्यात यावी, यासह विविध मागण्यांचा समावेश आहे. निवेदनावर पीसीएमचे राज्य सरचिटणीस महेश जोशी, जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# परतूर येथील उबाठा गटाच्या शिवसेना पदाधिकाऱ्यांचा शिंदे गटात प्रवेश



**परतुर । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते जालना येथे झालेल्या आभार दौऱ्यामध्ये शिवसेना पक्षात प्रवेश केलेल्या उबाठा गटाच्या शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांचे जिल्हा कार्यालय परतूर येथे शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल याच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये उद्धव ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब तेलगड, तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके, उपतालुकाप्रमुख प्रदीप ठोके, युवा सेना तालुकाप्रमुख सचिन डवले, सातोना विभाग प्रमुख किरण कातारे, आष्टी उपविभाग प्रमुख सुभाष गोरे, उपतालुकाप्रमुख संजय ठोंबरे, कामगार सेना तालुका अध्यक्ष आनंद वाकळे, आष्टी उपविभाग प्रमुख संतोष सागडे, ज्ञानेश्वर शेळके, सुभाष धुमाळ व अशा अनेक शिवसैनिकांचा शिवसेना जिल्हा प्रमुख मोहन अग्रवाल यांच्या संपर्क कार्यालया मध्ये सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल, उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब चिखले, तालुकाप्रमुख अमोल सुरंग, वि जे एन एन टी जिल्हा अध्यक्ष शिवाजी तरवटे, शहर प्रमुख दीपक हिवाळे, विधानसभा संघटक विजयकुमार गिरी, अल्पसंख्याक विभाग तालुकाध्यक्ष शेख खाजा शेख चांद, युवा सेना तालुकाप्रमुख अविनाश कापसे, श्रीष्टी विभाग प्रमुख अतुल आर्दड, सेवली विभाग प्रमुख प्रल्हादराव शेळके व आदी शिवसैनिकांची यावेळी उपस्थिती होती.

# अवैध गर्भपाता संदर्भात केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बाबत हेड कॉन्स्टेबल पव्हरे यांना प्रशस्तीपत्र



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील गर्भलिंग निदान आणि अवैध गर्भपाता संदर्भात रॅकेटचा शोध लावून उत्कृष्ट कामगिरी बजावल्या बाबत येथील स्थानिक गुन्हे शाखेचे हेड कॉन्स्टेबल रामप्रसाद पव्हरे यांचा पालकमंत्री पंकजाताई मुंढे यांनी प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.

भोकरदन शहरातील एका हॉस्पिटलमध्ये सुरू असलेल्या गर्भलिंग निदान आणि अवैध गर्भपाता संदर्भात रॅकेटचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शोध लावून आरोपींना अटक करण्यात आली तसेच गर्भलिंग निदानासाठी वापरण्यात येणाऱ्या सोनोग्राफी माशिनचा देखील शोध लावण्यात आला.

या कामगिरी बाबत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकासह हेड कॉन्स्टेबल रामप्रसाद पव्हरे यांचा देखील पालकमंत्री पंकजाताई मुंढे यांनी प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.



**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री एकनाथरावजी शिंदे यांनी माजी राज्यमंत्री आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या दर्शना बंगला या निवासस्थानी भेट दिली असता खोतकर परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, सौ कासाबाई खोतकर, सौ सीमाताई खोतकर, चक्रधर खोतकर, संजय खोतकर, अभिमन्यू खोतकर, जनार्दन खोतकर, कृष्णा खोतकर,अभिषेक खोतकर, सौ दर्शना झोल, सौ रचना खोतकर, सौ योगिता खोतकर, सौ अमृता डोंगरे, जयराज खोतकर व निलेश शिंदे आदी. (छाया अनिल व्यवहारे)**

# नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व जे बी के विद्यालयात रंगतरंग सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात साजरा

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** शहरातील नामांकित नवभारत शिक्षण संस्थेच्या श्रीमती जे बी के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयात आज दि.२४ जाने२०२६ रोजी, प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने बहारदार रंगतरंग या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, कार्यक्रमाच्या सुरुवातीला कार्यक्रमाच्या अध्यक्षा माजी जि.प.सदस्या जिजाबाई बापुराव कळंबे व कार्यक्रमाचे उद्घाटक माजी जि.प.सदस्य शालिकराव पाटील म्हस्के यांनी नटराजाचे पुजन करून रंगतरंग या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन केले,या कार्यक्रमा साठी नवभारत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष शेख जमिर शेख अमीर सर, सचिव सत्यनारायण सोनी, जेष्ठ संचालक मधुकर निकम सर, संचालक विश्वनाथराव सांगोळे संचालक.प्रदीप काबरा, सरपंच प्रतिनिधी गौतम म्हस्के, संचालक. टेंभुर्णी शहराच्या सरपंच सुमनबाई म्हस्के, सरपंच वसंतराव चव्हाण, सरपंच विठ्ठलराव गोरे, सरपंच निवृत्ती जाधव, सरपंच बबनराव राठोड, सरपंच नामदेव कुहीरे, प्राचार्य. नंदकुमार काळे, उपमुख्याध्यापक पंजाबराव सोळंके पर्यवेक्षक धनंजय पुराणे सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख एस बी बोरकर, जेष्ठ शिक्षक गणेश सावसक्के आदींची उपस्थिती होती,




विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून आयोजित करण्यात आलेल्या रंगतरंग या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थी कलाकारांनी आपल्या अंगभूत कलागुणांना सादर करून,एका पेक्षा एक सरस, बहारदार नृत्य गिते सादर करून उपस्थितांची मने जिंकली यांत युवराज साळुंखे यांने सादर केलेल्याः-गाव जागवीत आली वासुदेवाची स्वारी... आरती कबले कोमल ससाणे, शुभांगी शेळके,सुहानी खरात यांनी सादर केलेले पाटलांचा बैलगाडा... संचिता तिडके अक्षरा अंधारे यांनी सादर केलेले बहारदार नृत्य गित मदन मंजिरी...आचल म्हस्के प्राची जाधव यांनी सादर केलेले भिमराव पावरफुल... तर आदित्य इंगळे, वरद मुळे, प्रतिक घोडके, शिवम साळवे, निखिल पटेकर,सर्वेश जाधव युवराज साळुंखे यांनी सादर केलेल्या -माझ्या डोळ्यातील काजळ लय गया रे या रिमिक्स गाण्याने रंगत आणली, दुल्हे का सेहेरा सुहाना लगता हैं...या कव्वाली ने वातावरण भारावून टाकले, या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी पंचक्रोशीतील रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते, विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी अनेकांनी बक्षीसां ची अक्षरशः उधळण केली, या सर्व उत्कृष्ट कार्यक्रमाचे नेपथ्य वासुदेव शिरसागर यांचे होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष एस.बी.बोरकर, उपप्रमुख. भिवसन ससाणे, सचिव. संजय कुलकर्णी, गणेश सावसक्के, रमेश इंगळे, विष्णू जाधव, दत्ता उखर्डे, समाधान कांबळे, वासुदेव क्षिरसागर,एफ् ए.शेख, ज्योतीताई जाधव, विजया शिल्लार, राजेंद्र जगताप, प्रा.अरूण आहेर, राजेश शेवाळे, कैलास भूतेकर, आदींनी योगदान दिले तर रवींद्र मोरे,प्रा.सुनिल बनसोडे,प्रा.कैलास जाधव,प्रा .रामदास भांगे, सुनील सकुंडे, दिपक देशमुख, नागोराव देशमुख व इतर सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग यांनी परिश्रम घेतले.

# कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविधालयचे रा. से. यो. विशेष वार्षिक युवती शिबिरास प्रारंभ




**परभणी । प्रतिनिधी -** कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणीचे रा. से. यो. विशेष वार्षिक युवती शिबिर २०२४-२५ मौजे. पारवा जि. परभणी येथे मा. प्राचार्य डॉ.वसंत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होत आहें. ह्या शिबीराचे प्रारंभ योगासने, शालेय परिसर स्वच्छता, गटबांधनी, मतदान जनजागृती रॅली व मा.भीमराव साळवे मुख्यध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,मौजे. पारवा यांच्या मार्गदर्शनपर वक्तव्याने सुरू झाले. डिजिटल साक्षरता ही काळाची गरज आहे.भावी जीवनाबाबत चिंता व्यक्त करत मुलांना घडवण्याचे काम हे शिक्षकांसमोर खरोखर आव्हान असल्याच मत त्यांनी ह्या प्रसंगी व्यक्त केलं. ह्या कार्यक्रमासाठी रासेयोचे जिल्हा समन्वयक मा. अरूण पडघन सर, कार्यक्रमाधिकारी डॉ.नसीम बेगम, सह कार्यक्रमाधिकारी डॉ.संगीता लोमटे, डॉ. गणेश जाधव, प्रा. पी.डी. यादव, प्रा.कौसर बेगम, प्राध्यापक वर्ग, इतर शिक्षक वृंद, शालेय विद्यार्थी, शिबिरार्थि व ग्रामस्थ उपस्थित होते.

# जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटीबध्द - पालकमंत्री मुंडे

**जालना | प्रतिनिधी -** स्वातंत्र्य हा आपला अधिकार तर प्रजासत्ताक हा आपला अलंकार आहे. जालना जिल्ह्यात भाईचारा व संविधानाला सन्मान देणारा वर्ग उदयास यावा अशी आशा व्यक्त करते. तसेच जालना जिल्ह्यातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रगतीकरीता तसेच जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटीबध्द राहिल, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांनी केले.

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त जालना येथील पोलीस मुख्यालय मैदानावर श्रीमती मुंडे यांच्या हस्ते आज मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, आमदार संतोष दानवे, आमदार हिकमत उढाण, आमदार राजेश राठोड, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल आदींसह स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार व नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते.

पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, लोकशाही प्रणालीचा दीपस्तंभ ठरलेली भारतीय राज्यघटना राष्ट्राला अर्पण करण्यात आल्याने जगामध्ये भारत देश एक प्रजासत्ताक गणराज्य म्हणून उदयास आले. लोकशाही तंत्राने घटनेनुसार देशाचा कारभार सुरु झाला. नागरिकांना राज्यकारभारात सहभागी होण्याचा अधिकार मिळाल्याने या दिवसाला विशेष महत्व आहे. भारतीय घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीमध्ये अमुल्य योगदान राहिले. त्यामुळेच जगात भारतीय लोकशाही श्रेष्ठ ठरली आहे.

आपला जालना जिल्हा विकासाभिमुख जिल्हा म्हणून ओळखला जातो. विविध योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे विविध क्षेत्रात सतत अग्रेसर राहिला आहे, त्याचा मला जिल्ह्याची पालकमंत्री म्हणून अतिशय आनंद आणि अभिमान आहे. राज्य शासनाने सर्वसामान्य जनतेसाठी काही महत्वकांक्षी योजना सुरु केल्या आहेत. यामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज पुरवठा योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना आणि मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना या योजनांचा समावेश आहे.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' अंतर्गत जालना जिल्ह्यात ५ लाख २५ हजार पात्र महिलांना या योजनेअंतर्गत प्रति महा १ हजार ५०० लाभ देण्यात येत आहेत. तसेच राज्यातील ६५ वर्ष व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' सुरु करण्यात आली आहे. त्याअंतर्गत जिल्ह्यात २ हजाराहून अधिक अर्ज प्राप्त असून, त्यातील ४६८ जेष्ठ नागरिकांचे अर्ज पात्र ठरले आहेत.

राज्यातील युवकांना शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची नौकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' सुरु करण्यात आली असुन आतापर्यंत १ हजार ६६५ बेरोजगार युवकांची शिकाऊ प्रशिक्षणार्थी म्हणुन निवड करण्यात आलेली आहे. तसेच राज्यातील ६० वर्षांवरील जेष्ठ नागरिकांना भारतातील तीर्थयात्रांना भेट देण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी शासनाने 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत अर्ज स्विकारुन योग्य कार्यवाही सुरु आहे. 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज पुरवठा योजना' अंतर्गत शेतकऱ्यांवर येणाऱ्या वीज बिलाचा भार कमी करणे हा आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या ७.५ हॉर्सपावर क्षमतेच्या शेती पंपाना मोफत वीज पुरवठा केला जाणार आहे. तसेच राज्यातील मुलींना बारावी नंतर उच्च शिक्षणासाठी मोफत शिक्षण देण्याची योजना सुरु केली असुन, यामध्ये शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये १०० टक्के लाभ देण्यात येत आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि राज्याचे नाव देशात अग्रेसर ठेवण्यासाठी राज्य शासनाच्या प्रत्येक विभागाचा १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करून, ठोस कामगिरी करण्याचा निर्णय घेतला आहे. या आराखड्यात लोककेंद्रित व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जनतेला लाभ मिळणाऱ्या योजना आदींचा समावेश असणार आहे. राष्ट्रीय पशुधन अभियान अंतर्गत कुक्कुट पालनाचे २ प्रकल्प पूर्णत्वास येत असून, शेळी-मेंढी पालनाचे ४ प्रकल्प जिल्ह्यात कार्यान्वित होण्याच्या मार्गावर आहेत. या अंतर्गत जिल्हा उद्योजक, रोजगार आणि उत्पादन निर्मिती होण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व पशुपालक उद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून स्पर्धात्मक व सर्वसमावेक्षक पशुसंवर्धन मूल्यसाखळी विकसित करण्यासाठी बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत ६ प्रकल्प आपल्या जिल्ह्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहेत. केंद्र सरकारच्या महत्वकांक्षी ग्रीस्टॅक योजनेअंतर्गत महाराष्ट्र सरकारने राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा ओळख क्रमांक तयार करण्यात येत आहे. या शेतकरी ओळख क्रमांकाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणार आहे. जिल्ह्यातील धनगर व तत्सम जमातीतील मेंढी पालन करणाऱ्या घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेअंतर्गत २७३ लाभार्थ्यांना विविध १८ उपघटकातंर्गत लाभ देण्यात येणार आहे. शेतीपूरक व्यवसायामध्ये दुग्ध व्यवसाय, शेळी-मेंढी पालनाकरीता तसेच मराठवाडा पॅकेजअंतर्गत गाय, म्हैस, शेळी गटासाठी प्रत्येकी १ हजार लाभार्थ्यांसाठी ५० टक्के अनुदानावर विशेष योजना राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात २१ व्या पशुगणनेला २५ नोव्हेंबरपासून प्रारंभ झाला असून, याकरीता १६० प्रगणक व १ पर्यवेक्षक सदर काम पूर्णत्वास नेत आहेत.

स्टील व सीडस उद्योगामुळे आपला जिल्हा ओळखला जातो. यापुढे सिल्क अर्थात रेशीम शेती व त्यावरील प्रक्रिया उद्योगामुळे जिल्ह्याची नवीन ओळख निर्माण होत आहे. नवीन तुती लागवड करुन, जालना जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. जालना येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे टोमॅटीक रिलींग मशीनचीही उभारणी करण्यात आली असून, याद्वारे उत्कृष्ट दर्जाचे रेशीम सुताची निर्मिती करण्यात येत आहे. यामुळे अनेक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. रेशीम सूत उत्पादनाची पुढील प्रक्रीया जसे हातमागावर कापड बनविण्याचे काम लवकरच जालना येथे सुरु करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. बालविवाह रोखण्यासाठी मागील कालावधीत जिल्ह्यात चांगले काम झाले आहे. जिल्ह्यात मागील वर्षात १३७ बाल विवाह रोखण्यात महिला व बालविकास विभागाला यश आले आहे. क्रीडा विभागाच्यावतीने विकसीत करण्यात येत असलेल्या जिल्हा क्रीडा संकुलाच्या पहिल्या टप्प्यातील विकासकामाचे नुकतेच लोकार्पण करण्यात आले असुन दुसऱ्या टप्प्यातील विकासकामे प्रगतीपथावर आहेत. तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अत्याधुनिक सुविधा असलेले तालूका क्रीडा संकुल विकसीत करण्यात येत आहे. तसेच ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृह योजनेतंर्गत जालना जिल्ह्यासाठी १२ नवीन वसतिगृहे मंजूर झाली असून , यापैकी ८ वसतिगृहे सुरु झाली आहेत. कायदा व सुव्यवस्था, सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाच्या ठिकाणी जिल्हा नियोजनच्या निधीतून जालना शहरात ९० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहे. यामुळे पोलिस विभागाला गुन्हेगारी रोखण्यास मदत होणार आहे. जालना महानगर पालिका क्षेत्रातील नगर भूमापन झालेल्या क्षेत्रातील मिळकत पत्रिकासंदर्भात जनतेच्या तक्रारी वाढत आहेत. अशा स्वरुपाच्या तक्रारीवर तात्काळ कार्यवाही करण्यासाठी तसेच यापुढे अशा तक्रारी प्राप्त होवू नये याकरीता जिल्हाधिकारी यांच्या संकल्पनेतून जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांनी 'जालना महानगर पालिका क्षेत्रातील नगर भुमापन मिळकतींचे जी.आय.एस. आधारीत सर्व्हेक्षण' सुरु केले आहे. या कार्यक्रमास 'पवित्र' असे नाव देण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून नगर भूमापन क्षेत्रातील प्रत्येक मिळकतीस अक्षांस व रेखांश मिळणार आहेत. यामुळे भविष्यात मिळकतीच्या हद्दी संदर्भात वाद उत्पन्न होणार नाहीत, तसेच बिनशेती भुखंडाच्या मालकी हक्कांचे संरक्षण होणार आहे. असेही त्यांनी यावेळी सांगितले.



यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे यांच्या हस्ते जालना जिल्ह्यातील गौरवास्पद कामगिरी केलेल्या अधिकारी, कर्मचारी, खेळाडू, गुणवंत मार्गदर्शक, गर्भलिंग निदान प्रतिबंधक समिती पथक यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, मान्यवर व नागरिकांची भेट घेत त्यांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी पालकमंत्री श्रीमती मुंडे यांचे हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण झाले. यानंतर पालकमंत्री यांनी पोलीस परेडचे निरीक्षण केले. यावेळी पोलीस, होमगार्ड, सैनिक शाळेचे विद्यार्थी, एनसीसीच्या विद्यार्थ्यी यांची मानवंदना स्विकारली सलामी देण्यात आली. विविध विभागांनी चित्ररथाद्वारे योजनांचे सादरीकरण केले. शेवटी पोलिस विभागाने सायबर फ्रॉड जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. तसेच शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर सुंदर नृत्याचे सादरीकरण केले.

# एसटीच्या तिकीट दरवाढीचा विरोध

## जिल्हाभरात शिवसेनेचा चक्काजाम व निदर्शने

**जालना | प्रतिनिधी -** नुकतीच शासनाच्या वतीने एसटी महामंडळाच्या प्रवास भाड्यात १५ टक्क्यांनी मोठी वाढ केली. त्यामुळे जिल्ह्यासह राज्यात सर्वत्र सामान्य नागरिक तीव्र संतप्त झाला. शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व तालुक्यात चक्काजाम व निदर्शने करुन केलेली दरवाढ तात्काळ मागे घेण्याची जोरदार मागणी करण्यात आली. अगोदरच सर्वसामान्य नागरिक महागाईने होरपळला असून त्यात विधानसभा-लोकसभा निवडणुका झाल्यानंतर शासनाने अत्यंत स्वार्थी हेतूने एकीकडे महिलांना मोफत प्रवास म्हणत दुसरीकडे मात्र १५ टक्क्यांची मोठी दरवाढ केली. त्यामुळे गोर-गरीबांचे हक्काचे वाहन असणाऱ्या एसटीचा प्रवास महाग झाला आहे. सरकारच्या स्वार्थी धोरणामुळे गोर-गरीबांसह सर्वच महागाईने हतबल झाले आहे. एकीकडे निवडणुकीत महागाई कमी करु, अशा घोषणा करणार्या महायुती सरकारने जबरदस्त भाव वाढ करुन जनतेच्या तोंडाचे पाणी पळविले आहे.

जालना शहरासह सर्व तालुक्यात शिवसेनेच्या पदाधिकार्यांनी रस्त्यावर उतरुन प्रचंड घोषणाबाजी करीत केलेल्या दरवाढीचा धिक्कार केला असून ही दरवाढ तात्काळ मागे न घेतल्यास मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन उभारण्याचा इशाराही दिला आहे. जालना येथील बसस्थानकावर शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख बाबुराव पवार, मुरलीधर शेजुळ, हरिहर शिंदे, बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गेश काठोठीवाले, महिला आघाडीच्या प्रमुख मंगलताई मेटकर, मुरली थेटे, विजय पवार, संदीप नाईकवाडे, रविकांत जगधने, जे.के.चव्हाण, जनर्धन झोरे, ऋषी खिरे, राजेश शेळके, दर्शन चौधरी, शिवा मुळे, जीवन खंडागळे, सुनील तोडकर, वसीम खान, गुड्डू खान, सखावत पठाण, अजय रोडिये, गणेश लाहोटी, विठ्ठल पाऊलबध्दे, रामेश्वर बाहेकर, दुर्गेश शिंदे, योगेश जाधव, सावता तिडके, रामेश्वर कूरिल यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

भोकरदनमध्ये शिवसेना शहर प्रमुख महेश पुरोहित, उपशहर प्रमुख संतोष सुरडकर, युवा सेना शहर संघटक प्रदीप पैठणकर, बाळू जाधव, सुदाम जाधव, अण्णा सुरडकर यांच्यासह शिवसैनिकांची उपस्थिती होती. बदनापूर येथे जिल्हा संघटक भानुदासराव घुगे, उपजिल्हाप्रमुख भगवानराव कदम, परमेश्वर चंद, राजू जाधव, जावेद खान, केशव क्षीरसागर, अंकुश वाघ यांच्यासह शिवसैनिकांची उपस्थिती होती. अंबड येथे उपजिल्हाप्रमुख हनुमान धांडे,तालुकाप्रमुख अशोक बर्डे, तालुका संघटक दिनेश काकडे, कुमार रुपवते, नंदकिशोर पुंड, राम लांडे, कल्याण टकले, जगन दुर्गे, रमेश वराडे, सुरेश राजपूत यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

तर जाफराबाद येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात उपजिल्हाप्रमुख रमेश गव्हाड, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष उत्तमराव वानखेडे, तालुकाप्रमुख कुंडलिक मुठ्ठे,माजी तुकाध्यक्ष बजरंग बोरसे, शिवाजीराव गावंदे, बजरंग बोरसे, देवीसिंह बायस यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.